0 2 SEP 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गणेश चतुर्थी दिवशी 'आवाज' घुमला

## शहरात ध्वनी मर्यादेचे उल्लंघन; पर्यावरणशास्त्र विभागाचे मापन

■ **सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १ : गणेश चतुर्थी दिवशी बुधवारी (ता. २७) शहरात साउंड सिस्टीमचा आवाज घुमला. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागाने शांतता, निवासी, व्यावसायिक, औद्योगिक क्षेत्रांतील विविध तीस ठिकाणी ध्वनिमापन केले. त्यात रात्रीच्या वेळी सर्वच ठिकाणी ध्वनी मर्यादा ओलांडली असल्याचे दिसून आले.

पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे बिंदू चौक, मिरजकर तिकटी, बिनखांबी, महाद्वार रोड, गंगावेश, पापाची तिकटी, शाहूपुरी, लक्ष्मीपुरी आदी ठिकाणांसह राजारामपुरीतील पहिल्या गल्लीपासून १३व्या गल्लीपर्यंत आणि आजूबाजूच्या समांतर रस्त्यांवरील आवाजाची पातळी तपासण्यात आली. त्यात दिवसा आणि रात्रीच्यावेळी ध्वनी मापन करण्यात आले. या अधिविभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव, माजी विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सायंटिफिक असिस्टंट डॉ. चेतन भोसले, एम.एस्सी. अभ्यासक्रमाचे विद्यार्थी संग्राम चोपडे, आशाराम सुतार, साक्षी थोरात यांनी ध्वनिमापन केले.

> या ध्वनिमापनामध्ये गणेश चतुर्थी दिवशी सर्व ३० ठिकाणी रात्रीच्यावेळी आवाजाची पातळी ही ध्वनी प्रदूषण नियमाच्या मानांकनापेक्षा जास्त दिसून आली आहे.
>
> **- डॉ. आसावरी जाधव,**
> पर्यावरणशास्त्र अधिविभागप्रमुख

**'राजारामपुरी'तील ध्वनिमापन (डेसिबलमध्ये)**

| परिसर | २७ ऑगस्ट | | २८ ऑगस्ट | |
|---|---|---|---|---|
| | दिवसा | रात्री | दिवसा | रात्री |
| जगदाळे हॉल-डोमिनोज् परिसर | ७५.५५ | १११ | ७९.२६ | ६८.०५ |
| श्रीराम विद्यालय | ८१.८१ | १०४.२९ | ६७.२० | ६३.८१ |
| घोटणे गॅस एजन्सी | ७५.६१ | १०५.७१ | ७८.१८ | ६०.०४ |
| गुलमोहर हॉटेल | १००.७९ | ८८.९० | ८०.९५ | ७२.०३ |
| साई कार्डियॉक | ६४.०६ | ६५ | ६२.८५ | ६२.५२ |
| माऊली चौक | ८५.५५ | ७५ | ७९.८७ | ७२.८५ |
| जनता बझार | ८४.८० | ९८.७१ | ७५.४३ | ६८.१२ |
| चौथी गल्ली | ९३.८१ | १०७.७५ | ७४.७३ | ६६.१४ |
| आठवी गल्ली | ९७.७२ | १०२.६३ | ७२.१५ | ७१.९० |
| मारुती मंदिर | ७६.६१ | १०४ | ८०.०२ | ६९.३१ |

| आवाजाची मर्यादा (डेसिबलमध्ये) | |
|---|---|
| शांतता क्षेत्र | ४० |
| निवासी क्षेत्र | ४५ |
| व्यावसायिक क्षेत्र | ५५ |
| औद्योगिक क्षेत्र | ७० |

**ध्वनिमापन असे (डेसिबलमध्ये)**

| औद्योगिक क्षेत्र | | |
|---|---|---|
| परिसर | दिवसा | रात्री |
| उद्यमनगर | ९३.९५ | ७० |
| वाय. पी. पोवारनगर | ७३.७२ | ७३.४५ |

| व्यावसायिक क्षेत्र | | |
|---|---|---|
| बिंदू चौक | ७५.९९ | ६५.४३ |
| मिरजकर तिकटी | ७३.४५ | ६३.४३ |
| बिनखांबी | ७६.१९ | ५०.३० |
| महाद्वार रोड | ७४.५२ | ६२.१३ |
| गुजरी कॉर्नर | ७५.६१ | ५९.१३ |
| पापाची तिकटी | १०० | ५९.४० |
| गंगावेश | ८५.३७ | ७३.२५ |
| शाहूपुरी | ९५.६१ | ६५.१८ |
| लक्ष्मीपुरी | ५९.४७ | ४५.६१ |
| राजारामपुरी आठवी गल्ली | ९७.७२ | १०२.६३ |



| निवासी क्षेत्र | | |
|---|---|---|
| राजारामपुरी (साई कॉर्डियॉक परिसर) | ६४.०६ | ६५ |
| उत्तरेश्वरपेठ | ६५.६१ | ४८.९८ |
| ताराबाई पार्क | ६२.७५ | ७८.२१ |
| शिवाजीपेठ | ७३.३६ | ४७.५४ |
| नागाळा पार्क | ५१.९० | ४५.४३ |
| मंगळवारपेठ | ६६.९२ | ४६.५२ |

| शांतता क्षेत्र | | |
|---|---|---|
| सीपीआर | ७६.२९ | ६३.०६ |
| न्यायालय | ७१.०२ | ६४.५० |
| जिल्हाधिकारी कार्यालय | ७७.८९ | ४८.९८ |
| शिवाजी विद्यापीठ | ४९.२३ | ४३.८९ |

### 'राजारामपुरी'ने मर्यादा ओलांडली

■ शहरात गणेश चतुर्थी दिवशी राजारामपुरी परिसरातील मंडळांतर्फे आगमन मिरवणूक काढली जाते. त्यामध्ये साऊंड सिस्टीमचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. त्याठिकाणी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे यावर्षी पहिल्यांदाच ध्वनिमापन करण्यात आले. त्यात गणेश चतुर्थी आणि त्याच्या दुसऱ्या दिवशी ध्वनिमापन केले. त्यामध्ये दिवसा आणि रात्रीच्यावेळी ध्वनी मर्यादा ओलांडली असल्याचे दिसून आले.

0 4 SEP 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर करा

## शिक्षक, अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशासनाच्या सूचना; शासनाच्या धोरणावर टीका करू नका

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३ : बायोमेट्रिक हजेरी, सीसीटीव्हीच्या परिपत्रकापाठोपाठ आता शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने सोशल मीडिया वापराबाबतचे परिपत्रक काढून शिक्षक, अधिकारी, कर्मचाऱ्यांना सूचना केल्या आहेत. त्यात प्रत्येकाने सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर करावा. राज्य-केंद्र शासनाच्या धोरणांवर टीका करू नका, आदी सूचनांचा समावेश आहे.

राज्य शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांच्या सोशल मीडिया वापराबाबत मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या आहेत. त्यापार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनातर्फे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी त्याबाबतचे परिपत्रक मंगळवारी काढले आहे. त्यात अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, अधिकारी आणि सेवकांनी सोशल मीडियाचा वापर अत्यंत जाणीवपूर्वक आणि जबाबदारीने करावा.

वैयक्तिक आणि कार्यालयीन सोशल मीडिया अकाउंट स्वतंत्र ठेवावेत. केंद्र अथवा राज्य शासनाने



बंदी घातलेल्या वेबसाईट, ॲपचा वापर करण्यात येऊ नये. वैशिष्ट्यपूर्ण शासकीय कामाबाबत मजकूर पोस्ट करता येईल. मात्र, त्याद्वारे स्वयंप्रशंसा होणार नाही याची खबरदारी घ्यावी. आक्षेपार्ह, द्वेषमूलक, मानहानीकारक, भेदभाव उत्पन्न होणारे मजकूर शेअर, अपलोड अथवा फॉरवर्ड करू नका, अशा सूचना विद्यापीठ प्रशासनाने केल्या आहेत.

दरम्यान, शैक्षणिक संस्था, महाविद्यालयांकडे त्यांच्याशी संबंधित नसलेल्या व्यक्तीकडून संस्थेविषयी अथवा विद्यापीठ, कर्मचाऱ्यांविरूद्ध केलेल्या तक्रारीचे अर्ज प्राप्त होतात. त्या अर्जाबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सूचनेनुसार कार्यवाही करण्याची सूचनाही परिपत्रकाद्वारे विद्यापीठ प्रशासनाने केली आहे.

### विद्यापीठाला शनिवारी पूर्ण सुटी

■ अनंत चतुर्दशीनिमित्त विद्यापीठाला शनिवारी (ता. ६) पूर्ण दिवस सुटी असणार आहे. कुलगुरूंनी त्यांच्या अधिकारातील राखीव अर्धी सुटी त्यादिवशी जाहीर केली आहे.

02 SEP 2025
तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गणपती आगमनालाही आवाजाच्या डेसिबलमध्ये वाढ

## शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र अधिविभागाचा अहवाल

**प्रतिनिधी**
कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागातर्फे गणेश चतुर्थी दिवशी गणेश आगमनाला कोल्हापूर शहरातील ३० ठिकाणी रात्रीच्यावेळी आवाजाची पातळी डेसीबलमध्ये मोजली. राजारामपुरी भागात गणेश चतुर्थी दिवशी व दुसऱ्या दिवशी साऊंड सिस्टिमच्या आवाजाच्या पातळीत मानांकनापेक्षा जास्त वाढ झाली होती. पापाची तिकटी येथे सगळ्यात जास्त शंभर डेसिबलपर्यंत आवाजाची पातळी असल्याचे निदर्शनास आले.

शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागातर्फे गणेश आगमनावेळी आवाजाची पातळी मोजली. यामध्ये शांतता क्षेत्रात म्हणजेचं सीपीआर परिसरात कोर्ट, जिल्हाधिकारी कार्यालय, शिवाजी विद्यापीठ परिसरातील आवाजाची पातळी मोजली. रहिवासी क्षेत्रातील राजारामपुरी, उत्तरेश्वर पेठ, ताराबाई पार्क, शिवाजी पेठ, नागाळा पार्क, मंगळवार पेठ तर व्यावसायिक क्षेत्रातील बिंदू चौक, मिरजकर तिकटी, बिनखांबी गणेश मंदिर, महाद्वार रोड, गुजरी कॉर्नर, पापाची तिकटी, गंगावेश, शाहूपुरी, लक्ष्मीपुरी, राजारामपुरी पहिली गल्ली येथील साऊंड सिस्टिमच्या आवाजाची पातळी मोजली. यामध्ये व्यावसायिक क्षेत्रात पापाची तिकटी येथे मानांकनानुसार ५९.४० डेसीबल आवाजाची पातळी असताना येथे शंभर डेसीबलपर्यंत आवाजाची पातळी वाढली. त्यापाठोपाठ राजारामपुरी पहिली गल्ली येथे ९७.७२ डेसीबल तर शाहूपुरी येथे ९५.६१ डेसीबलपर्यंत आवाजाची पातळी वाढली होती.

| व्यावसायिक क्षेत्र | आवाज डेसिबलमध्ये |
|---|---|
| बिंदू चौक | ७५.९९ |
| मिरजकर तिकटी | ७३.४५ |
| बिनखांबी गणेश मंदिर | ७६.१९ |
| महाव्दार रोड | ७४.५२ |
| गुजरी कॉर्नर | ७५.६१ |
| पापाची तिकटी | १००.० |
| गंगावेश | ८५.३७ |
| शाहूपुरी | ९५.६१ |
| लक्ष्मीपुरी | ५९.४७ |
| राजारामपुरी पहिली गल्ली | ९७.७२ |

| औद्योगिक क्षेत्र | आवाज डेसिबलमध्ये |
|---|---|
| उद्यमनगर | ९३.९५ |
| वाय. पी. पवार नगर | ७३.७२ |

| रहिवासी क्षेत्र | आवाज डेसिबलमध्ये |
|---|---|
| राजारामपुरी | ६४.०६ |
| उत्तरेश्वर पेठ | ६५.६१ |
| ताराबाई पार्क | ६२.७५ |
| शिवाजी पेठ | ७३.३६ |
| नागाळा पार्क | ५१.९० |
| मंगळवार पेठ | ६६.९२ |

| शांतता | आवाज डेसिबलमध्ये |
|---|---|
| सीपीआर | ७६.२९ |
| कोर्ट | ७१.०२ |
| जिल्हाधिकारी कार्यालय | ७७.८९ |
| शिवाजी विद्यापीठ | ४९.२३ |

### मानांकनाच्या नियमांचे पालन करावे

गणपती आगमनाला मोजमाप केले या दिवशी आवाजाची पातळी जास्त राहिली आहे. मानांकनाच्या नियमांचे पालन करणे नागरिकांची जबाबदारी आहे. परंतु तरुणांकडून या नियमांचे पालन होत नाही. पर्यावरण संवर्धनासाठी तरुणांनी नियमांचे पालन केले पाहिजे.

– **डॉ. आसावरी जाधव** (अधिविभागप्रमुख, पर्यावरणशास्त्र, शिवाजी विद्यापीठ)

औद्योगिक क्षेत्रात उद्यमनगर येथे ९३.९५ डेसीबल आवाजाची पातळी होती. तसेच शांततामय क्षेत्रात सीपीआर परिसरात ७६.२९ डेसिबलपर्यंत आवाजाची पातळी होती.

02 SEP 2025
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गणेश आगमनादिवशी आवाजाने मर्यादा ओलांडली !


## शहरातील सर्वच भागात मानांकनापेक्षा जास्त ध्वनी ; पर्यावरण शास्त्र विभागाकडून तपासणी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागातर्फे गणेश आगमनादिवशी राजारामपुरी १ ते १३ गल्लीसह समांतर रस्त्यावरील आवाजाची पातळी तपासण्यात आली. यामध्ये सर्वच ठिकाणी आवाजाची पातळी मानांकनापेक्षा जास्त वाढल्याचे दिसून आले. पापाची तिकटी येथे सगळ्यात जास्त शंभर डेसिबलपर्यंत आवाजाची पातळी गेली होती.

पर्यावरणशास्त्र विभागातर्फे गणेश आगमनावेळी कोल्हापूर शहरातील ३० ठिकाणी रात्रीच्यावेळी आवाजाची पातळी मोजण्यात आली. यामध्ये शांतता क्षेत्रात म्हणजेच सीपीआर परिसर, न्यायालय, जिल्हाधिकारी कार्यालय, शिवाजी विद्यापीठ परिसरातील आवाजाची पातळी मोजण्यात आली. रहिवासी क्षेत्रातील राजारामपुरी, उत्तरेश्वर पेठ, ताराबाई पार्क, शिवाजी पेठ, नागाळा पार्क, मंगळवार पेठ तर व्यावसायिक क्षेत्रातील बिंदू चौक, मिरजकर तिकटी, बिनखांबी गणेश मंदिर, महाद्वार रोड, गुजरी कॉर्नर, पापाची तिकटी, गंगावेश, शाहुपूरी, लक्ष्मीपुरी, राजारामपुरी पहिली गल्ली येथील साऊंड सिस्टीमच्या आबाजाची पातळी मोजली गेली.

यामध्ये व्यावसायिक क्षेत्रात पापाची तिकटी येथे मानांकनानुसार ५९.४० डेसिबल आवाजाची पातळी असताना येथे शंभर डेसिबलपर्यंत आवाजाची पातळी वाढल्याचे दिसून आले. त्यापाठोपाठ राजारामपुरी पहिली गल्ली येथे ९७.७२ डेसिबल तर शाहूपुरी येथे ९५.६१ डेसिबलपर्यंत आवाजाची पातळी वाढली होती. औद्योगिक क्षेत्रात उद्यमनगर येथे ९३.९५ डेसिबल आवाजाची पातळी होती. शांततामय क्षेत्रात सीपीआर परिसरात ७६.२९ डेसिबलपर्यंत आवाजाची पातळी होती.




शिवाजी विद्यापीठातून

“ गणपती आगमनाला शहर परिसरातील ध्वनीचे मोजमाप केले. या दिवशी आवाजाची पातळी जास्त राहिली. मानांकनाच्या नियमांचे पालन करणे नागरिकांची जबाबदारी आहे. परंतु तरुणांकडून या नियमांचे पालन होताना दिसत नाही. पर्यावरण संवर्धनासाठी तरुणांनी नियम पाळून पुढाकार घेण्याची गरज आहे.

**-डॉ. आसावरी जाधव,** विभागप्रमुख, पर्यावरणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ)

| शांतता क्षेत्र : आवाजाची पातळी (डेसिबलमध्ये) | |
|---|---|
| सीपीआर | ७६.२९ |
| न्यायालय | ७१.०२ |
| जिल्हाधिकारी कार्या. | ७७.८९ |
| शिवाजी विद्यापीठ | ४९.२३ |

| रहिवासी क्षेत्र आवाजाची पातळी (डेसिबलमध्ये) | |
|---|---|
| राजारामपुरी | ६४.०६ |
| उत्तरेश्वर पेठ | ६५.६१ |
| ताराबाई पार्क | ६२.७५ |
| शिवाजी पेठ | ७३.३५ |
| नागाळा पार्क | ५१.९० |
| मंगळवार पेठ | ६६.९२ |

| व्यावसायिक क्षेत्र आवाजाची पातळी (डेसिबलमध्ये) | |
|---|---|
| बिंदू चौक | ७५.९९ |
| मिरजकर तिकटी | ७३.४५ |
| बिनखांबी गणेश मंदिर | ७६.१९ |
| महाद्वार रोड | ७४.५२ |
| गुजरी कॉर्नर | ७५.६१ |
| पापाची तिकटी | १००.०० |
| गंगावेश | ८५.३७ |
| शाहूपुरी | ९५.६१ |
| लक्ष्मीपुरी | ५९.४७ |
| राजारामपुरी १ली गल्ली | ९७.७२ |

| औद्योगिक क्षेत्र आवाजाची पातळी (डेसिबलमध्ये) | |
|---|---|
| उद्यमनगर | ९३.९५ |
| वाय.पी.पोवारनगर | ७३.७२ |

02 SEP 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गणेश आगमनाला 'आवाज' वाढलेलाच

## शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाकडून अभ्यास



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

श्री गणेश आगमनादिवशी रात्रीच्या वेळी शहरात सर्वच ठिकाणी आवाजाची पातळी ओलांडली होती, तर राजारामपुरीमधील आगमन मिरवणुकीत अनेकवेळा आवाज मर्यादा मानांकनाच्या दुपटीवर जाऊन पोहोचली. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाकडून ध्वनिमापन करून त्याचे विश्लेषण करण्यात आले. शहरातील ४ क्षेत्रांमध्ये एकूण ३० ठिकाणी मोजमाप घेतल्याची माहिती आसावरी जाधव यांनी दिली.

**राजारामपुरीत दणदणाट**

राजारामपुरी परिसरात दिवसा आणि रात्री मोठ्या प्रमाणात दणदणाट होता. दिवसाची ध्वनी मर्यादा ६५ डेसिबल, तर रात्रीची मर्यादा ५५ डेसिबल आहे; मात्र जनता बझार चौक परिसर, श्री राम विद्यालय, घोटणे गॅस एजन्सी, चौथी गल्ली, आठवी गल्ली मारुती मंदिर आदी परिसरात १०० पेक्षा अधिक डेसिबलवर ध्वनी मर्यादा पोहोचली होती. त्यामुळे आता विसर्जन मिरवणुकीकडे लक्ष लागले आहे.

### क्षेत्रनिहाय ध्वनिमापन दिवस-रात्र असे (डेसिबल)

| | दिवस | रात्र |
|---|---|---|
| शांतता क्षेत्र मर्यादा | ५० | ४० |
| सीपीआर रुग्णालय | ७६.२९ | ६३.६ |
| न्यायालय | ७१.२ | ६४.५० |
| जिल्हाधिकारी कार्यालय | ७७.८९ | ४८.९८ |
| शिवाजी विद्यापीठ | ४९.२३ | ४३.८९ |
| निवासी क्षेत्र मर्यादा | ५५ | ४५ |
| राजारामपुरी | ६४.६ | ६५ |
| शिवाजी पेठ | ७३.३६ | ४७.५४ |
| मंगळवार पेठ | ६६.९२ | ४६.५२ |
| उत्तरेश्वर पेठ | ६५.६१ | ४८.९८ |
| नागाळा पार्क | ५१.९० | ४५.४३ |
| ताराबाई पार्क | ६२.७५ | ७८.२१ |

| | दिवस | रात्र |
|---|---|---|
| व्यावसायिक क्षेत्र मर्यादा | ६५ | ५५ |
| लक्ष्मीपुरी | ५९.४७ | ४५.६१ |
| बिंदू चौक | ७५.९९ | ६५.४३ |
| मिरजकर तिकटी | ७३.४५ | ६३.५४ |
| बिनखांबी गणेश मंदिर | ७६.१९ | ५०.३० |
| महाद्वार रोड | ७४.५२ | ६२.१३ |
| गुजरी कॉर्नर | ७५.६१ | ५९.१३ |
| पापाची तिकटी | १०० | ५९.४० |
| गंगावेश | ८५.३७ | ७३.२५ |
| शाहूपुरी | ९५.६१ | ६५.१८ |
| राजारामपुरी ८ वी गल्ली | ९७.७२ | १०२.६३ |
| औद्योगिक क्षेत्र मर्यादा | ७५ | ७० |
| वाय. पी. पोवारनगर | ७३.७२ | ७३.४५ |
| शिवाजी उद्यमनगर | ९३.९५ | ४७.४३ |

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 SEP 2025
लोकमत

# विद्यापीठात विद्यार्थी, शिक्षकांना बायोमेट्रिक हजेरी अनिवार्य होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अधिविभागातील शिक्षक-विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक करण्यात आली आहे. तसेच अधिविभागात सीसीटीव्ही बसविण्याचे काम पूर्ण करावे, असे आदेश कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सर्व अधिविभाग प्रमुखांना काढले आहेत.

अधिविभागात होणाऱ्या दैनंदिन नियमित अध्यापनावेळी प्रतितासिका प्रात्यक्षिक व शिक्षक, विद्यार्थी उपस्थितीच्या बायोमेट्रिक नोंदी ठेवल्या जात नाहीत. तसेच अधिविभागात अद्यापही सीसीटीव्ही लावण्यात आलेले नाहीत, असे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. याबाबत विद्यापीठ अधिविभाग, सेंटर्स, अध्यासने येथील कार्यरत हंगामी व नियमित शिक्षक, समन्वयक तसेच अधिविभागप्रमुख यांना कुलसचिव डॉ. शिंदे यांनी ३० ऑगस्ट रोजी आदेश काढले आहेत.

त्यानुसार विद्यार्थी, शिक्षकनिहाय वेळापत्रकानुसार व शिक्षकांच्या निर्धारित कार्यभारानुसार दैनंदिन बायोमेट्रिक नोंदीचे हजेरीपत्रक तयार करून अधिविभागामध्ये जतन करून ठेवणे आता यापुढे आवश्यक आहे. विद्यापीठ प्रशासनाने मागणी केल्यास बायोमेट्रिक हजेरीपत्रक सादर करावे. आवश्यकतेनुसार अधिविभागात सीसीटीव्ही बसविण्याचे काम अधिविभाग स्तरावर तत्काळ पूर्ण करून घ्यावे, असे कुलसचिवांच्या आदेशात म्हटले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 SEP 2025
तरुण भारत

# अधिविभागांमध्ये बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक

- **कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे अधिविभागप्रमुखांना आदेश**

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अधिविभागातील शिक्षक, विद्यार्थांसाठी बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक करण्यात आली आहे. तसेच अधिविभागात सीसीटीव्ही बसविण्याचे काम पूर्ण करावे, असे आदेश कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सर्व अधिविभाग प्रमुखांना काढले आहेत. अधिविभागात होणाऱ्या दैनंदिन नियमित अध्यापनावेळी प्रती तासिका प्रात्यक्षिक व शिक्षक, विद्यार्थी उपस्थितीच्या बायोमेट्रीक नोंदी ठेवल्या जात नाहीत. याबाबत विद्यापीठ अधिविभाग, सेंटर्स, अध्यासने येथील कार्यरत हंगामी व नियमित शिक्षक, समन्वयक तसेच अधिविभागप्रमुख यांना कुलसचिव डॉ. शिंदे यांनी ३० ऑगस्ट रोजी आदेश काढले आहेत. त्यानुसार दैनंदिन बायोमेट्रीक नोंदीचे हजेरीपत्रक तयार करून अधिविभागामध्ये जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. विद्यापीठ प्रशासनाने मागणी केल्यास बायोमेट्रीक हजेरीपत्रक सादर करावे. सीसीटीव्हीचे काम अधिविभागस्तरावर तत्काळ पूर्ण करून घ्यावे, असे आदेशात म्हटले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 SEP 2025
पुढारी

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र प्रवेश परीक्षा अर्जासाठी मुदतवाढ

**शिवाजी विद्यापीठातून**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पदवीप्राप्त व शिवाजी विद्यापीठामध्ये विविध विभागामध्ये पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विदयार्थ्यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र प्रवेश परीक्षा अर्जासाठी ४ सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग ( यूजीसी) नवी दिल्ली योजनेअंतर्गत एस.सी, एस.टी, ओबीसी, ई.डब्ल्यू.एस (नॉन क्रिमीलेयर) व अल्पसंख्याक (मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, आणि जैन) आणि खुल्या गटातील विदयार्थ्याकरिता विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश परीक्षा अर्ज प्रक्रिया सुरु केली आहे. ४ सप्टेंबरपर्यंत यास मुदतवाढ देण्यात येत आहे. प्रवेश परीक्षा दि. ९ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४ ते ५.३० या वेळेत ऑफलाईन पद्धतीने विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात घेण्यात येणार असल्याची माहिती केंद्राचे संचालक डॉ. पी.एस.कांबळे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

02 SEP 2025

पुढारी

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## DEPARTMENT OF TECHNOLOGY

Institute Code : 6028

Ested.1962
NAAC "A++" Grade
with CGPA 3.52

(AICTE Approved and Recognized by DTE Govt. of Maharashtra)

**First Year M. Tech. Admission 2025-26**

**Admission for vacant seats after CAP Round for following M. Tech. Programs**

- Computer Science & Technology
- Electronics & Tele - Comm. Engg.
- Food Technology
- Environmental Sci. & Technology
- Energy Technology

Contact No: 0231-2609424
Mob: 9850695437, 9975945011
Website: https://apps.unishivaji.ac.in

Interested candidates must register using QR code:

Dr. V. N. Shinde
Registrar
Shivaji University, Kolhapur

Date: 02/09/2025